भारत सरकार

विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) अधिनियम, १९८६

(सन १९८६ चा अधिनियम क्रमांक ६१)

[दिनांक २१ एप्रिल २००३ रोजी यथाविद्यमान]

# The Child Labour (Prohibition and Regulation) Act, 1986

**(Act No. 61 of 1986)**

**[ As in force on the 21st April, 2003]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[ किंमत : रु. ४.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक २१ एप्रिल २००३ रोजी यथाविद्यमान असलेल्या दि चाईल्ड लेबर (प्रोव्हिबिशन अँड रेग्युलेशन) अॅक्ट, १९८६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचें राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक ३, दिनांक २ आॅक्टोबर २००३ यात पृष्ठ १६३ ते १६८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २ खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक : २ आॅक्टोबर, २००३.

**डॉ. सुभाष चंद्र जैन,**
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the The Child Labour (Prohibition and Regulation) Act, 1986 as on the 21st April 2003, contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India,* Exraordinary Part XII, section 1, No. 3, Vol. 12, dated 2nd October 2003 on pages 163 to 168.

This authoritative text was published under the authority of the President under Section-2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

Dr. SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

New Delhi,
Dated 2nd October, 2003.

# बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) अधिनियम, १९८६

कलमांचा क्रम

कलमे

## भाग एक
### प्रारंभिक


१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.


## भाग दोन
### विवक्षित व्यवसायात आणि प्रक्रियेत बालकांना नोकरीवर ठेवण्यास प्रतिबंध


३. विवक्षित व्यवसायात आणि प्रक्रियेत बालकांना नोकरीवर ठेवण्यास प्रतिबंध.
४. अनुसूची सुधारित करण्याचा अधिकार.
५. बाल कामगार तंत्र सल्लागार समिती.


## भाग तीन
### बालकांच्या कामाच्या अधिकारांचे विनियमन


६. या भागाची प्रयुक्ती.
७. कामाचे तास व कालावधी.
८. आठवडी सुट्टया.
९. निरीक्षकाला नोटीस देणे.
१०. वयासंबंधीचे विवाद.
११. नोंदवही ठेवणे.
१२. कलमे ३ व १४ यांचा गोषवारा अंतर्भूत असलेली नोटीस लावणे.
१३. आरोग्य व सुरक्षितता.


## भाग चार
### संकीर्ण


१४. दंड.
१५. दंडाच्या संबंधात विवक्षित कायद्यांच्या दुरुस्त्या लागू होणे.
१६. गुन्ह्यासंबंधीची कार्यपद्धती.
१७. निरीक्षकांची नियुक्ती.
१८. नियम करण्याचा अधिकार.
१९. नियम आणि अधिसूचना संसद किंवा विधानमंडळासमोर ठेवणे.
२०. कायद्याच्या विवक्षित अन्य उपबंधांना आडकाठी नसणे.
२१. अडचणींचे निवारण करण्याचा अधिकार.
२२. निरसन व व्यावृत्ती.

पहिली अनुसूची
भाग-क
व्यवसाय.
भाग-ख
प्रक्रिया.

# बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) अधिनियम, १९८६

## (१९८६ चा अधिनियम क्रमांक ६१)

(२१ एप्रिल, २००३ रोजी यथाविद्यमान)

[२३ डिसेंबर, १९८६]

**बालकांना विवक्षित नोकऱ्यांमध्ये गुंतवण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि विवक्षित अन्य नोकऱ्यांमधील बालकांच्या कामाच्या शर्तीचे विनियमन करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सदतिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## भाग एक

### प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास, "बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) अधिनियम, १९८६" असे म्हणावे. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) या अधिनियमाचा भाग तीन खेरीजकरून सर्व तरतुदी ताबडतोब अंमलात येतील, आणि केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास भाग तीन अंमलात येईल आणि निरनिराळ्या राज्यांसाठी व निरनिराळ्या वर्गाच्या आस्थापनांसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(एक) "समुचित शासन" याचा अर्थ, केंद्र सरकारच्या नियंत्रणाखालील कोणतीही आस्थापना किंवा रेल्वे प्रशासन किंवा मोठे बंदर किंवा खाण किंवा तेलक्षेत्र यांच्याबाबतीत केंद्र सरकार आणि इतर सर्व प्रकरणी राज्य शासन, असा आहे ;

(दोन) "बालक" याचा अर्थ, जिच्या वयाला चौदा वर्षे पूर्ण झालेली नाहीत अशी व्यक्ती, असा आहे ;

(तीन) "दिवस" याचा अर्थ, मध्यरात्रीला सुरू होणारा चोवीस तासांचा कालावधी, असा आहे ;

(चार) "आस्थापना" यात दुकान, वाणिज्यिक आस्थापना, कार्यशाळा, शेत, निवासी हॉटेल, उपाहारगृह, खाद्यगृह, नाट्यगृह, किंवा सार्वजनिक मनोरंजनाची किंवा करमणुकीची अन्य ठिकाणे, यांचा समावेश आहे ;

(पाच) "कुटुंब" याचा अधिनियंत्रकाच्या संबंधातील अर्थ, एखादी व्यक्ती, अशा व्यक्तीची, यथास्थिति, पत्नी किंवा पती आणि त्यांची मुले, अशा व्यक्तीचा भाऊ किंवा बहीण, असा आहे ;

(सहा) "अधिनियंत्रक" याचा आस्थापना किंवा कार्यशाळा यांच्या संबंधातील अर्थ, आस्थापनेच्या किंवा कार्यशाळेच्या कारभारावर जिचे अंतिम नियंत्रण आहे अशी व्यक्ती, असा आहे ;

(सात) "बंदर प्राधिकरण" याचा अर्थ, बंदराचे प्रशासन करणारे कोणतेही प्राधिकरण, असा आहे ;

(आठ) "विहित" याचा अर्थ, कलम १८ खाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(नऊ) "आठवडा" याचा अर्थ, शनिवारच्या मध्यरात्रीपासून किंवा निरीक्षकाने विशिष्ट क्षेत्राकरिता लेखी मान्यता दिली असेल अशा अन्य मध्यरात्रीपासून सुरू होणारा सात दिवसांचा कालावधी, असा आहे ;

(दहा) "कार्यशाळा" याचा अर्थ, जेथे कोणतीही औद्योगिक प्रक्रिया चालवली जाते अशी कोणतीही जागा (तिच्या प्रसीमा धरून) असा आहे, पण ज्या जागेला कारखाना अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३) याच्या कलम ७६ च्या तरतुदी त्यावेळी लागू होत असतील, अशा कोणत्याही जागेचा त्यात समावेश होणार नाही.

## भाग दोन

### विवक्षित व्यवसायात आणि प्रक्रियेत बालकांना नोकरीवर ठेवण्यास प्रतिबंध

**३.** कोणत्याही बालकाला, अनुसूचीच्या "भाग क" मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही व्यवसायात किंवा विवक्षित व्यवसायात ज्या कोणत्याही कार्यशाळेत अनुसूचीच्या "भाग ख" मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही प्रक्रिया करण्यात येत आणि प्रक्रियेत असतील त्या कार्यशाळेत कामावर लावता येणार नाही किंवा काम करण्याची परवानगी [illegible]ळणार नाही : **बालकांना नोकरीवर ठेवण्यास प्रतिबंध.**

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट, ज्या कोणत्याही कार्यशाळेत अधिनियंत्रक त्याच्या कुटुंबाच्या

मदतीने कोणतीही प्रक्रिया करीत असेल अशा कार्यशाळेला किंवा शासनाने स्थापन केलेल्या किंवा शासनाकडून सहाय्य किंवा मान्यता प्राप्त झालेल्या कोणत्याही शाळेला लागू असणार नाही.

**अनुसूची सुधारित करण्याचा अधिकार.** ४. केंद्र सरकार, तसा आपला उद्देश असल्याबाबत शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कमीत कमी तीन महिन्यांची नोटीस देऊन, तशाच अधिसूचनेद्वारे अनुसूचीमध्ये कोणताही व्यवसाय किंवा प्रक्रिया जादा दाखल करू शकेल आणि तद्नंतर ही अनुसूची तदनुसार सुधारित केली असल्याचे मानण्यात येईल.

**बाल कामगार तंत्र सल्लागार समिती.** ५. (१) केंद्र सरकार, अनुसूचीमध्ये व्यवसाय आणि प्रक्रिया जादा दाखल करण्याच्या प्रयोजनार्थ, केंद्र सरकारला सल्ला देण्याकरिता, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, बाल कामगार तंत्र सल्लागार समिती (यापुढे या कलमात जिचा निर्देश "समिती" म्हणून करण्यात आला आहे) या नावाची एक सल्लागार समिती घटित करू शकेल.

(२) या समितीमध्ये एक अध्यक्ष व केंद्र सरकारकडून नियुक्त करण्यात येतील असे, दहापेक्षा अधिक नसतील इतके अन्य सदस्य असतील.

(३) समिती, तिला आवश्यक वाटेल तेव्हा, समितीची बैठक बोलावील आणि तिच्या कार्यपद्धतीचे विनियमन करण्याचा तिला अधिकार असेल.

(४) समिती, तिला तसे करणे आवश्यक वाटले तर, एक किंवा त्याहून अधिक उपसमित्या घटित करू शकेल आणि तशा कोणत्याही उपसमितीवर जो कोणी समितीचा सदस्य नसेल अशा कोणत्याही व्यक्तीची सर्वसाधारण कारणासाठी असो किंवा कोणत्याही विशिष्ट बाबीचा विचार करण्याकरिता असो नियुक्ती करू शकेल.

(५) समितीचा पदावधी, तिच्या कार्यालयातील नैमित्तिक रिक्त जागा भरण्याची रीत आणि समितीचा अध्यक्ष व अन्य सदस्यांना देय असणारे भत्ते काही असल्यास, व समिती जी कोणी त्या समितीचा सदस्य नसेल, अशा व्यक्तीला तिच्या उपसमितीचा सदस्य म्हणून ज्या शर्ती व निर्बंधाच्या अधीनतेने नियुक्त करू शकेल त्या शर्ती व निर्बंध, हे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

## भाग तीन

### बालकांच्या कामाच्या अधिकारांचे विनियमन

**या भागाची प्रयुक्ती.** ६. या भागाच्या तरतुदी ह्या, कलम ३ मध्ये निर्देशिलेले कोणतेही व्यवसाय किंवा प्रक्रिया ज्या आस्थापनांमध्ये चालू नसतील अशा आस्थापनांना किंवा आस्थापनांच्या वर्गाला लागू होतील.

**कामाचे तास व कालावधी.** ७. (१) कोणत्याही बालकाला कोणत्याही आस्थापनेमध्ये, अशा आस्थापनेसाठी किंवा आस्थापनांच्या वर्गासाठी विहित करण्यात येईल तितक्या तासांहून अधिक काळ काम करावयास लावण्यात येणार नाही किंवा काम करण्यास परवानगी मिळणार नाही.

(२) प्रत्येक दिवशी कामाचा कालावधी हा, तीन तासांहून अधिक होणार नाही अशा रीतीने निश्चित करण्यात येईल आणि कोणत्याही बालकाने विश्रांतीसाठी किमान एका तासाचे मध्यंतर घेतल्याशिवाय, त्याला तीन तासांपेक्षा अधिक काळ काम करता येणार नाही.

(३) बालकाच्या कामाचा कालावधी अशा तऱ्हेने योजण्यात येईल की, जेणेकरून पोटकलम (२) खालील त्याच्या विश्रांतीच्या मध्यंतरासह कामाच्या प्रतीक्षेत घालवलेला वेळ धरून, तो, कोणत्याही दिवशी सहा तासांपेक्षा अधिक होणार नाही.

(४) कोणत्याही बालकाला, संध्याकाळी ७ ते सकाळी ८ या वेळेत काम करण्याची परवानगी मिळणार नाही किंवा काम करावयास लावले जाणार नाही.

(५) कोणत्याही बालकाला अतिकालिक काम करावे लागणार नाही किंवा काम करण्यास परवानगी मिळणार नाही.

(६) कोणतेही बालक, एखाद्या आस्थापनेत ज्या कोणत्याही दिवशी अगोदर काम करीत असेल त्या दिवशी त्याला दुसऱ्या आस्थापनेत काम करण्यास लावता येणार नाही किंवा काम करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

**आठवडी सुट्टया.** ८. एखाद्या आस्थापनेमध्ये कामावर लावलेल्या प्रत्येक बालकाला, प्रत्येक आठवड्यातील एका दिवशी पूर्णपणे सुट्टी राहील असा दिवस अधिनियंतकाने आस्थापनेमध्ये ठळक ठिकाणी कायमची नोटीस लावून विनिर्दिष्ट केलेला असेल आणि असा विनिर्दिष्ट केलेला दिवस, अधिनियंतकास तीन महिन्यांतून फक्त एकदा बदलता येईल.

९. (१) एखाद्या आस्थापनेच्या संबंधात या अधिनियमाचा प्रारंभ होण्याच्या लगतपूर्वीच्या दिनांकास ज्या आस्थापनेमध्ये बालकाला कामावर ठेवलेले असेल किंवा काम करण्याची परवानगी दिलेली असेल तर, अशा आस्थापनेच्या संबंधातील प्रत्येक अधिनियंत्रक, ज्याच्या स्थानिक सीमांमध्ये अशी आस्थापना स्थित आहे अशा निरीक्षकाला पुढील तपशीलाचा अंतर्भाव असलेली लेखी नोटीस पाठवील :— निरीक्षकाला नोटीस देणे.

(क) आस्थापनेचे नाव व जागा ;

(ख) आस्थापनेचे प्रत्यक्ष व्यवस्थापन करणाऱ्या व्यक्तीचे नाव ;

(ग) ज्या पत्त्यावर आस्थापनेसंबंधातील पत्रव्यवहार केला पाहिजे तो पत्ता ; आणि

(घ) आस्थापनेत चालणाऱ्या व्यवसायाचे किंवा प्रक्रियेचे स्वरूप.

(२) ज्या एखाद्या आस्थापनेच्या संबंधात या अधिनियमाचा प्रारंभ झाल्याच्या दिनांकानंतर जो अधिनियंत्रक, त्या आस्थापनेच्या संबंधात बालकाला कामावर ठेवील किंवा काम करण्याची परवानगी देईल असा प्रत्येक अधिनियंत्रक, ज्याच्या स्थानिक सीमांमध्ये अशी आस्थापना स्थित आहे अशा निरीक्षकाला अशा रीतीने कामावर ठेवल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत पोटकलम (१) मध्ये नमूद केलेल्या तपशीलाचा अंतर्भाव असलेली लेखी नोटीस पाठवील.

स्पष्टीकरण.—पोटकलमे (१) व (२) यांच्या प्रयोजनार्थ, "आस्थापनेच्या संबंधात या अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक" याचा अर्थ, अशा आस्थापनेच्या संबंधात हा अधिनियम अंमलात आणण्याचा दिनांक, असा आहे.

(३) कलमे ७, ८, ९ यांमधील कोणतीही गोष्ट, अधिनियंत्रक, ज्या कोणत्याही आस्थापनेत आपल्या कुटुंबाच्या मदतीने कोणतीही प्रक्रिया चालवत असेल त्या आस्थापनेला किंवा शासनाकडून स्थापन करण्यात आलेल्या किंवा सहाय्य मिळत असलेल्या किंवा मान्यता मिळालेल्या कोणत्याही शाळेला लागू असणार नाही.

१०. अधिनियंत्रकाने, ज्याला आस्थापनेमध्ये कामावर ठेवले आहे किंवा काम करण्याची परवानगी दिली आहे अशा कोणत्याही बालकाच्या वयासंबंधी निरीक्षक व अधिनियंत्रक यांच्यामध्ये वाद उपस्थित झाल्यास, अशा बालकाच्या वयाबाबत विहित वैद्यकीय प्राधिकरणाने प्रमाणपत्र दिलेले नसल्यास, निरीक्षक, तो प्रश्न विहित वैद्यकीय प्राधिकरणाकडे निर्णयार्थ सोपवील. वयासंबंधीचे विवाद.

११. प्रत्येक अधिनियंत्रक, कोणत्याही आस्थापनेमध्ये कामावर ठेवलेल्या किंवा काम करण्याची परवानगी दिलेल्या बालकासंबंधी एक नोंदवही ठेवील आणि कामाच्या वेळात सर्वकाळ किंवा अशा कोणत्याही आस्थापनेमध्ये काम चालू असेल त्यावेळी निरीक्षकाला ती निरीक्षणासाठी उपलब्ध असेल व त्या नोंदवहीत पुढील गोष्टी दर्शविण्यात येतील :— नोंदवही ठेवणे.

(क) अशा प्रकारे कामावर ठेवलेल्या किंवा काम करण्याची परवानगी दिलेल्या प्रत्येक बालकाचे नाव व जन्मदिनांक ;

(ख) अशा कोणत्याही बालकाच्या कामाच्या वेळा व त्याच्या हक्काचा विश्रांतीचा मध्यंतराचा काळ;

(ग) अशा कोणत्याही बालकाच्या कामाचे स्वरूप; आणि

(घ) विहित करण्यात येतील असे अन्य तपशील.

१२. प्रत्येक रेल्वे प्रशासन, प्रत्येक बंदर प्राधिकरण आणि प्रत्येक अधिनियंत्रक हा, यथास्थिति, त्या रेल्वेच्या प्रत्येक स्थानकावर किंवा बंदराच्या सीमांमध्ये किंवा कामाच्या ठिकाणी, सहज दिसू शकेल व सहज जाता येईल अशा ठळक ठिकाणी कलमे ३ व १४ यांचा गोषवारा अंतर्भूत असणारी नोटीस स्थानिक भाषेत आणि इंग्रजी भाषेमध्ये लावण्याची तजवीज करील. कलमे ३ व १४ यांचा गोषवारा अंतर्भूत असलेली नोटीस लावणे.

१३. (१) समुचित शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कोणत्याही आस्थापनेमध्ये किंवा आस्थापनांच्या वर्गामध्ये नोकरीवर ठेवलेल्या किंवा काम करण्याची परवानगी दिलेल्या बालकांचे आरोग्य व सुरक्षितता यांसाठी नियम करू शकेल. आरोग्य व सुरक्षितता.

(२) उक्त नियमांच्या पूर्ववर्ती तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, खालील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी नियम करण्यात येतील :—

(क) कामाच्या जागेची स्वच्छता राखणे व ती उपद्रवरहित करणे;

(ख) कचऱ्याची आणि निसूत पाण्याची विल्हेवाट लावणे ;

(ग) वायुवीजन आणि तापमान ;

(घ) धूळ आणि धूर ;

(ङ) कृत्रिम आर्द्रीकरण ;

(च) प्रकाशयोजना ;

(छ) पिण्याचे पाणी ;

(ज) शौचकूप व मुताऱ्या ;

(झ) थुंकदाण्या ;

(ञ) यंत्रसामग्रीस कुंपण घालणे ;
(ट) चालू यंत्रसामग्रीवर किंवा यंत्रसामग्रीजवळ काम करणे ;
(ठ) धोकादायक यंत्रांवर बालकांना नोकरीवर ठेवणे ;
(ड) धोकादायक यंत्रांवर नोकरीवर ठेवलेल्या बालकांच्या संबंधात सूचना, प्रशिक्षण देणे आणि पर्यवेक्षण करणे ;
(ढ) वीजप्रवाह खंडीत करण्याचे साधन ;
(ण) स्वयंचलित यंत्रे ;
(त) नवीन यंत्रसामग्री सुकर करणे ;
(थ) तळजमीन, जिने आणि पोच मार्ग ;
(द) खळी, खड्डे, जमिनीतील खळगे, इत्यादी.
(ध) अत्याधिक वजन ;
(न) डोळ्यांचे संरक्षण ;
(प) स्फोटक व ज्वालाग्राही धूळ, वायू, इत्यादी.
(फ) आगीच्या प्रसंगी बाळगावयाची सावधगिरी ;
(ब) इमारतींची देखभाल ; आणि
(भ) इमारत आणि यंत्रसामग्रींची सुरक्षितता.

## भाग चार

### संकीर्ण

शास्ती.

१४. (१) जो कोणी, कलम ३ च्या तरतुदींचे व्यतिक्रमण करून कोणत्याही बालकास नोकरीवर ठेवील किंवा काम करण्याची परवानगी देईल तो, तीन महिन्यांपेक्षा कमी नसणाऱ्या परंतु एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कारावासास किंवा दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसणाऱ्या परंतु वीस हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(२) जो कोणी, कलम ३ खालील अपराधाचा सिद्धदोषी असेल त्याने तदनंतर तसाच अपराध केल्यास, तो सहा महिन्यांपेक्षा कमी नसणाऱ्या परंतु दोन वर्षांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असेल.

(३) जो कोणी,—

(क) कलम ९ द्वारे आवश्यक असलेली नोटीस देण्यास कसूर करील ; किंवा

(ख) कलम ११अ अनुसार आवश्यक असलेली नोंदवही राखण्यास कसूर करील किंवा अशा कोणत्याही नोंदवहीत खोटी नोंद करील; किंवा

(ग) कलम १२ अनुसार आवश्यक असल्याप्रमाणे कलम ३ चा आणि या कलमाचा गोषवारा अंतर्भूत असणारी नोटीस लावण्यास कसूर करील ; किंवा

(घ) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींचे अनुपालन करण्यास कसूर करील, किंवा त्यांचे व्यतिक्रमण करील,

तो एक महिन्यापर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या साध्या कारावासास किंवा दहा हजार रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

शास्तीच्या संबंधात विवक्षित कायद्यांच्या दुरुस्त्या लागू होणे.

१५. (१) जर कोणतीही व्यक्ती, पोटकलम (२) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही तरतुदींचे व्यतिक्रमण केल्यामुळे दोषी असल्याचे आढळेल आणि सिद्धदोषी ठरेल तर, ती, या अधिनियमाच्या कलम १४ ची पोटकलमे (१) व (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे शास्तीस पात्र असेल ; परंतु ह्या तरतुदी, ज्या अधिनियमांमध्ये अंतर्भूत असतील त्या अधिनियमांखाली नव्हे.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देश केलेल्या तरतुदी ह्या खाली नमूद केलेल्या तरतुदी असतील :—

(क) कारखाना अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३) याचे कलम ६७ ;

(ख) खाण अधिनियम, १९५२ (१९५२ चा ३५) याचे कलम ४० ;

(ग) वाणिज्य नौवहन अधिनियम, १९५८ (१९५८ चा ४४) याचे कलम १०९ ; आणि

(घ) मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१ (१९६१ चा २७) याचे कलम २१.

गुन्ह्यासंबंधीची कार्यपद्धती.

१६. (१) या अधिनियमाखाली कोणत्याही व्यक्तीस, पोलीस अधिकाऱ्यास किंवा निरीक्षकास, सक्षम अधिकारिता असणाऱ्या कोणत्याही न्यायालयात अपराध घडल्याची फिर्याद दाखल करता येईल.

(२) बालकाच्या वयासंबंधी विहित वैद्यकीय प्राधिकरणाने दिलेले प्रत्येक प्रमाणपत्र हे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, ते ज्याच्या संबंधीचे असेल त्या बालकाच्या वयाबाबतचा निर्णायक पुरावा असेल.

(३) महानगर दंडाधिकारी किंवा प्रथमवर्ग दंडाधिकारी यांच्यापेक्षा कनिष्ठ दर्जाचे कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही गुन्ह्यांची संपरीक्षा करणार नाही.

**निरीक्षकांची नियुक्ती.**

१७. समुचित शासन, या अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन निश्चितपणे व्हावे या प्रयोजनासाठी काही व्यक्तींना निरीक्षक म्हणून नियुक्त करू शकेल व अशा रीतीने नियुक्त केलेला कोणताही निरीक्षक "भारतीय दंड संहिता" (१८६० चा ४५) याच्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानले जाईल.

**नियम करण्याचा अधिकार.**

१८. (१) समुचित शासन, या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे व पूर्वप्रकाशनाच्या शर्तींच्या अधीनतेने नियम करू शकेल.

(२) विशेषेकरून व पूर्वगामी अधिकारांच्या व्यापकतेस बाध न येता, खालीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी नियम करता येतील :—

(क) बाल कामगार तंत्र सल्लागार समितीचे अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी, त्यांच्या नैमित्तिक रिक्त जागा भरण्याची पद्धत आणि त्यांना देय असणारे भत्ते, आणि कलम ५ च्या पोट कलम (५) अन्वये, ज्या शर्ती व निर्बंध यांच्या अधीनतेने एखाद्या उप समितीवर सदस्येतर व्यक्तींची नियुक्ती करता येईल, त्या शर्ती व निर्बंध ;

(ख) कलम ७ च्या पोटकलम (१) अन्वये जितके तास बालकाला, कामे करणे आवश्यक करण्यात येईल किंवा काम करण्याची परवानगी देण्यात येईल ते तास ;

(ग) नोकरीवर असलेल्या किंवा कामाच्या शोधात असलेल्या तरुण व्यक्तींच्या संबंधात वयाचे प्रमाणपत्र देणे, अशी प्रमाणपत्रे देऊ शकणारी वैद्यकीय प्राधिकरणे, अशा प्रमाणपत्राचा नमुना, त्याबद्दल आकारता येईल ते शुल्क व ज्या रीतीने अशी प्रमाणपत्रे देता येतील ती रीत :

परंतु, अर्जासोबत जर संबंधित प्राधिकरणाने समाधानकारक मानलेला असा वयाचा पुरावा असेल तर, असे कोणतेही प्रमाणपत्र देण्याबद्दल कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही ;

(घ) कलम ११ खाली ठेवावयाच्या नोंदवहीत अंतर्भूत करावयाचा तपशील.

**नियम आणि अधिसूचना संसद किंवा विधान-मंडळासमोर ठेवणे.**

१९. (१) केंद्र सरकार या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम आणि कलम ४ अन्वये काढण्यात आलेली प्रत्येक अधिसूचना, तो करण्यात आल्यानंतर किंवा ती काढण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवली जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी, जर, त्या नियमात किंवा अधिसूचनेत कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम किंवा अधिसूचना करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम किंवा अधिसूचना, अशा आपरिवर्तित स्वरूपात परिणामक होईल, किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली किंवा अधिसूचनेखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

(२) राज्य शासनाने या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, त्या राज्याच्या विधानमंडळासमोर ठेवण्यात येईल.

**कायद्याच्या विवक्षित अन्य तरतुदींना आडकाठी नसणे.**

२०. कलम १५ मध्ये अंतर्भूत असणाऱ्या तरतुदींच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली केलेले नियम हे, कारखाना अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३), मळे कामगार अधिनियम, १९५१ (१९५१ चा ६९), आणि खाण अधिनियम, १९५२ (१९५२ चा ३५) यांच्या तरतुदींना न्यूनकारी नसतील तर, त्यात भर घालणारे असतील.

**अडचणींचे निवारण करण्याचा अधिकार.**

२१. (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, केंद्र सरकार **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनाकरिता त्यास आवश्यक व इष्ट वाटत असेल असे, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेल्या कोणत्याही तरतुदी करू शकेल :

परंतु, या अधिनियमाला ज्या दिनांकास राष्ट्रपतींची अनुमती मिळाली त्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) या कलमाखाली काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संसदेच्या सभागृहांपुढे ठेवण्यात येईल.

**निरसन व व्यावृत्ती.**

२२. (१) बालक सेवायोजन अधिनियम, १९३८ (१९३८ चा २६) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही, अशा निरसित झालेल्या अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कृती किंवा केल्याचे किंवा करण्यात आल्याचे अभिप्रेत असलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये केल्याचे किंवा करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

# पहिली अनुसूची

(कलम ३ पहा)

## भाग–क

### व्यवसाय

खालील बाबींशी संबंधित व्यवसाय

(१) प्रवासी, माल किंवा डाक यांची रेल्वेने वाहतूक ;

(२) रेल्वेच्या आवारात कोळसागाळ गोळा करण्याचे, राखेची खळी उपसण्याचे किंवा बांधकाम विषयक काम ;

(३) रेल्वे स्थानकावरील खान-पान सेवेतील विक्रेत्याला वा त्या सेवेतील अन्य कोणत्याही कर्मचाऱ्याला ज्या कामांकरिता एका फलाटावरून दुसऱ्या फलाटावर जावे लागते किंवा चालत्या गाडीत चढावे वा उतरावे लागते ती कामे ;

(४) रेल्वे स्थानकाच्या बांधकामासंबंधीच्या कामाशी निगडीत असलेले किंवा जे काम रेल्वे रुळांच्या अगदी जवळ किंवा रुळांच्या मध्ये करावयाचे असते अशा कामाशी निगडीत असलेले काम ;

(५) कोणत्याही बंदराच्या हद्दीतील एखादे बंदर प्राधिकरण.

## भाग ख

### प्रक्रिया

(१) विड्या वळणे.

(२) गालिचे विणणे.

(३) सिमेंट निर्मिती, सिमेंट पोत्यात भरण्याच्या कामासह.

(४) कापडावर छपाई, ते रंगवणे व विणणे.

(५) आगपेट्या, स्फोटक द्रव्ये व फटाके यांची निर्मिती.

(६) अभ्रक कापणे व त्याचे तुकडे करणे.

(७) लाखेची निर्मिती.

(८) साबण निर्मिती.

(९) कातडी कमावणे.

(१०) लोकर साफ करणे.

(११) इमारत व बांधकाम उद्योग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई